# मिरा भाईंदर महानगरपालिका

**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**जा.क्र.मनपा/घ.व्य./२१०/२०२४-२५**
**दिनांक :- ०५/०७/२०२४**

## // आदेश //

**विषय :- दि. ०१ जुलै, २०२४ ते दि. ३१ ऑगस्ट, २०२४ या कालावधीत "सफाई अपनाओ बिमारी भगाओ" अभियान राबविणेबाबत.**

संदर्भ :- 1. सह सचिव तथा राष्ट्रीय अभियान संचालक, केंद्रीय गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय, भारत सरकार यांचे यांचे अ.शा.पत्र D.O.N०.२१/१/२०२२-SBM-II दि.२४.०६.२०२४.
2. महाराष्ट्र नागरी विकास अभियान संखलनालय (स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी) यांचे कडील दि. 14/06/2024 रोजीचे पत्र

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय अभियान संचालक , गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय , भारत सरकार यांचे कडील सं दर्भाधीन पत्रान्वये दिनांक ०१ जुलै, २०२४ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २०२४ या कालावधीत "सफाई अपनाओ बिमारी भगाओ" अभियान राबविणेबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार महापालिका क्षेत्रात खालील प्रमाणे उपक्रम राबविणे बाबत.

| अ.क्र. | करावयाचे काम | अमंलबजावणी अधिकारी | पर्यवेक्षीय अधिकारी |
|---|---|---|---|
| 1. | जास्त कचरा असलेल्या भागात विशेष स्वच्छता मोहिम राबविणे | डॉ. सचिन बांगर (उपायुक्त) (घनकचरा व्यवस्थापन ) | श्री. अनिकेत मानोरकर (अतिरिक्त आयुक्त) |
| 2. | शहरातील सर्व भागातून दररोज कचरा संकलन व वाहतूक करणे. | | |
| 3. | सर्व सामुदायिक व सार्वजनिक शौचालयाची स्वच्छता करणे. | | |
| 4. | सर्व अंगणवाडी व शाळांमधील मुलांसाठी स्वच्छता सुविधांवर लक्ष केंद्रीत करणे. | श्रीम. सोनाली मातेकर (शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग | |
| 5. | पाण्याच्या गुणवत्तेसाठी पुरेसे नमुने घेणे. | श्री. शरद नानेगांवकर (कार्यकारी अभियंता ) ( पाणी पुरवठा) | |
| 6. | सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि जलकामांची (Water Work ) देखभाल करणे | | |
| 7. | उच्च जोखमीचे क्षेत्रे (High Risk Areas) ओळखण्यासाठी जलद उपाय योजना करणे | श्री. नरेंद्र चव्हाण (आपत्कालीन व्यवस्थापन विभाग)<br>श्री. दिपक खांबित (शहर अभियंता) अधिकारी)<br>श्री. प्रकाश बोराडे अग्निशामक अधिकारी | डॉ. संभाजी पानपटटे अतिरिक्त आयुक्त |

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**जा.क्र.मनपा/घ.व्य./२१०/२०२४-२५**
**दिनांक :- ०५/०७/२०२४**

| अ.क्र. | करावयाचे काम | अमंलबजावणी अधिकारी | पर्यवेक्षीय अधिकारी |
|---|---|---|---|
| 8. | आपातकालीन स्थितीत नागरीकांचे स्थलांतर करण्यासाठी उपाय योजना करणे. | श्री. नरेंद्र चव्हाण (आपत्कालीन विभाग)<br>सर्व प्रभाग अधिकारी | |
| 9. | संरक्षण, प्रतिबंध, उपचार धोरण अवलंबणे. | डॉ. बी.टी. दुधभाते | |
| 10. | आंतर विभागीय समन्वय व देखरेख करणे. | सर्व विभाग प्रमुख | |

**कामाचे स्वरुप व कार्यपध्दती :-**

१. विशेष स्वच्छता मोहिम विशेष स्वच्छता मोहिम आयोजित करण्यात यावी त्यामध्ये उघड्यावर कचरा टाकण्यावर प्रतिबंध , नाल्यातील गाळ काढणे , साचलेल्या पाण्याचा निचरा करणे , शहरी झोपडपट्टया / अनौपचारीक वसाहती, बाजार पेठा यावर विशेष लक्ष केंद्रीत करावे.

२. कचऱ्यांचे संकलन व वाहतूक दररोज घनकचऱ्यांचे संकलन करून त्यांची वाहतूक प्रक्रिया केंद्रावर करण्यात यावी, जास्त पावसाच्या वेळेस (High Rainfall) विशेष सुविधांचे व्यवस्थापन करावे.

३. सर्व सामुदायिक व सार्वजनिक शौचालयाची नियमीत साफसफाई करणे उच्च जोखमीच्या (High Risk Areas) / झोपडपट्टयामध्ये सर्व सामुदायिक व सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता व देखभालीचे नियोजन करावे . पाणी आणि हात धुण्याच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष मोहिम राबवावी.

४. मुलांवर लक्ष केंद्रीत करणे सर्व अंगणवाडी केंद्र , शाळा, निवासी वस्तीगृहामध्ये स्वच्छ पाणी व स्वच्छ शौचालयाची सुविधा सुनिश्चित करणे. त्यासाठी आवश्यक दुरूस्ती व देखभाल तातडीने करावी.

५. पाण्याची गुणवत्ता- पाण्याच्या गुणवत्ता चाचणीसाठी पुरेसे नमुने घेण्यासाठी उपाय योजना करावी.

६. शुध्द पाण्याचा पुरवठा करणे सर्व शहरांमध्ये अखंडीत शुध्द पाण्याचा पुरवठा करण्यात यावा त्याकरिता पाण्याच्या कामाची दुरूस्ती (Water Work ), ओवरहेड पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता व देखभाल तसेच जलशुध्दीकरण केंद्र कार्यरत ठेवण्यात यावे.

७. उच्च जोखीम क्षे त्र ओळखण्यासाठी जलद मुल्यांकन अतिसाराचा प्रार्दुभाव , इतर जलजन्य रोग, साथीचे रोग इत्यादीना प्रतिबंध करण्यासाठी उपाय योजना तयार ठेवणे.

८. माहिती शिक्षण प्रसार व जनजागृती शहरातील नागरिकांना सोबत घेऊन कचरा न टाकणे , हात धुण्याची व्यवस्था, स्वच्छता इत्यादीसाठी जनजागृती करणे. तसेच त्यासाठी आपातकालीन क्रमांकाच्या सुविधेची प्रसिद्धी करणे.

९. संरक्षण, प्रतिबंध, उपचार धोरण अवलंबणे स्वच्छतेच्या कामांची तयारी करून दि . ०१ जुलै, २०२४ ते दि. ३१ ऑगस्ट, २०२४ या कालावधीत संरक्षण, प्रतिबंध, उपचार धोरणाचा अवलंब करून अतिसार व इत र साथीचे रोग टाळण्यासाठी उपलब्ध संसाधने वापरण्यात यावीत.

१०. समन्वय व सनियंत्रण आंतर विभागीय समन्वयाच्या सहाय्याने पावसाळापूर्व तयारी करणे , आवश्यक तेथे दंडाचे नियमन आणि सुधारात्मक कृती करणे.

**अभियानाचा कालावधी -**

**आठवडा १ ते २ (दि.१ जुलै ते दि.१४ जुलै, २०२४)**

१. कार्यक्रम प्रक्षेपण राज्य / जिल्हा / ब्लॉक स्तरावर अतिसार व्यवस्थापनाच्या कार्यक्रमाचे प्रक्षेपण करणे,

२. स्वच्छता मोहिम जास्त कचरा असलेल्या भागात विशेष स्वच्छता मोहिम राबविणे जेणे करून उच्च प्रतीची स्वच्छता सुनिश्चित होईल.

३. सातत्य - तयारीच्या टप्प्यात सुचीबद्ध केलेल्या सर्व क्रिया व कृती सुरू ठेवाव्यात

४. प्रशिक्षण- स्थानिक समुदाय, संस्था आणि शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना पाण्याचे व्यवस्थापन, स्वच्छता आणि स्वच्छतेचा प्रचार या बाबत प्रशिक्षण देण्यात यावे. ५. स्वच्छता कर्मचारी - स्वच्छता कर्मचाऱ्यांची काळजी व सुविधेसाठी विशेष पावले उचलण्यात यावीत.

६. स्वच्छता आणि स्वच्छता जागरूकता स्थानिक स्वयसेवी संस्था (NGO), खाजगी क्षेत्रातील संस्था व इतर भागधारक यांना सोबत घेऊन स्वच्छता जागरूकतेच्या संदेशांचा प्रसार करण्यात यावा

**आठवडा ३ ते ६ (दि.१५ जुलै ते दि.१६ ऑगस्ट, २०२४)**

१. समुदायचा सहभाग स्थानिक जलस्रोत व स्वच्छता सुविधा यांची स्वच्छता मानके मजबूत करण्यासाठी प्रभाग स्तरीय समित्या, RWA, BWG याचा सहभाग घेण्यात यावा.

२. जनजागृती मोहिम स्वच्छतेचे महत्व, पाण्याची स्वच्छता आणि त्याचा प्रभाव याचे महत्त्व पटवून देण्यासाठी नागरी झोपडपट्टयामध्ये जनजागृती मोहिम सुरू करावी.

३. सातत्य - तयारीच्या टप्प्यात सुचीबद्ध केलेल्या सर्व क्रिया व कृती सुरू ठेवाव्यात

**आठवडा ७ ते ८ (दि.१७ ते दि.३१ ऑगस्ट, २०२४)**

१. सामुदायिक सहभाग आणि शिक्षण शहरी झोपडपट्टयामध्ये स्वच्छ पाणी व सुरक्षि त स्वच्छता याचे वर्तन राखण्यासाठी स्थानिक स्वयसेवी संस्था (NGO) यांचे मदतीने नागरिकांना ज्ञान व कौशल्यासह सक्षम करणे

२. रेन वॉटर हार्वेस्टिंग पावसाळी पाणी साठवण आणि छतावरील पावसाळी पाणी साठवण यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग तंत्राचा प्रचार करावा,

३. पावसाळ्या नंतरच्या देखभालीचे नियोजन घनकचरा व्यस्थापन आणि स्वच्छतेसाठी आवश्यक असलेल्या पावसाळ्या नंतरच्या कोणत्याही कामाचे नियोजन करण्यात यावे,

४. एकात्मता स्वच्छ भारत मिशनच्या मोहिमेशी एकरूप होऊन सुरक्षित स्वच्छता , कचरा वर्गीकरण, शौचालयाचा वापर सुनिश्चित करणे , स्वच्छतेसाठी हात धुणे , परिसर स्वच्छ ठेवणे यासाठी सामाजिक वर्तन बदल घडवून आणणे,

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**जा.क्र.मनपा/घ.व्य./२१०/२०२४-२५**
**दिनांक :- ०५/०७/२०२४**

०७. अभियानाचा प्रसार "सफाई अपनाओ बिमारी भगाओ " अभियानाची परीणामकारता व लोकप्रियता वाढविण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्रेस रिलीज / प्रेस मिटींग आयोजित करावेत. NGO सहाय्यता बचत गट , एफ एम रेडीओ चॅनल , SBM राजदूत, प्रभावकार (Influencer) ब्लॉगर्स यांचा स हभाग घ्यावा. या व्यतिरिक्त # SafaiApnaoBimaariBhagao हा हॅशटॅग वापरून तसेच SBM२.० चे @Swachh Bharat Gov आणि @MOHUA_India व @MoHFW_India ह्या ट्यूटर हँडलला टॅग करून स्वच्छता मोहिमेच्या नाविण्यपूर्ण पद्धती, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेले चांगले काम, स्वच्छतेचा प्रभाव इ. सर्व सोशल मिडीयावर शेअर करावे.

०८. मोहिमेचा अहवाल - साप्ताहीक अहवाल सादर करण्यासाठी स्वच्छतम पोर्टलवर एक विशेष मॉड्युल तयार केले जात आहे . सर्व नागरी स्था निक स्वराज्य संस्थांनी दिनांक ३१ ऑगस्ट, २०२४ पर्यंत दर शुक्रवारी त्यांनी केलेल्या कार्यवाही व प्रगतीचा अहवाल द्यावा. स्वच्छतम पोर्टलवरील फिल्ड खालील प्रमाणे आहेत.

१. विशेष स्वच्छता मोहिमेची संख्या
२. जास्त वर्दळीची ठिकाणे, शहरी झोपडपट्ट्या तसेच इतर कचरा संवेदनशील क्षेत्रे या ठिकाणी राबविलेल्या कचरा संकलन व वाहतुक मोहिमेची संख्या.
३. GVP निर्मुलन संख्या
४. पूर्णपणे स्वच्छ असलेल्या, हात धुण्यासाठी व पाण्याची सुविधा असलेल्या सामुदायिक व सार्वजनिक शौचालयाची संख्या.
५. स्वच्छ आणि सुविधांनी सुसज्ज असलेल्या शाळा, अंगणवाडी, वस्तीगृहांची संख्या.
६. दररोज गोळा केलेल्या पाण्याच्या गुणवत्तेच्या नमुन्यांची संख्या.
७. पाणी पुरवठा पायाभूत सुविधांची देखभाल / प्रतिबंधात्मक स्वच्छता उपक्रम (१०० शब्द),
८. जलजन्य रोग, साथीचे रोग तसेच स्वच्छतेबाबत घरोघरी केलेल्या माहिती शिक्षण प्रसार व जनजागृती (IEC)
९. फॉगिंग, ब्लीचिंग, नाल्यांचे निर्जंतुकीकरण करणे याबाबतची माहिती
१०. आंतर विभागीय अभिसरणासाठी (Convergence) केलेले प्रयत्न (१०० शब्द).
११. नवकल्पना (Innovations) / चांगल्या पद्धती (Good Practices) / विशेष उपक्रम (Special initiatives) (१०० शब्द).
१२. सफाई मित्रांच्या कल्याणासाठी उपक्रम (१०० शब्द).

०९ "सफाई अपनाओ बिमारी भगाओ " अभियान राबविताना वरील प्रत्येक बाबींची २-३ (HD) छायाचित्र शेअर करावीत, तसेच प्रत्येक सप्ताहात केलेल्या कार्यक्रमांपैकी सर्वोत्तम कार्यक्रमाचा व्हिडीओ शेअर करावा.

उपरोक्त सुचंनाचा अवलंब करुन विहीत मुदतीत कार्यवाही करावी . केंद्र शासनाच्या स्वच्छतम पोर्टलवर माहीती अपलोड करणे करीता व महाराष्ट्र शासन संचालनालयाला अहवाल देणे करीता आपल्या विभागामार्फत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**घनकचरा व्यवस्थापन विभाग**
**जा.क्र.मनपा/घ.व्य./२१०/२०२४-२५**
**दिनांक :- ०५/०७/२०२४**

केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विहीत मुदतीत घनकचरा व्यवस्थापन विभागास सादर करावा. सदर ई - मेल आय डी वर माहीती पाढविण्यात यावी. (swmhealth@mbmc.gov.in)

आधिक माहीतीसाठी संपर्क :- 1. अक्षय ढबाले (9545664145) 2. पोर्णिमा पवार (9623271443) 3.राधिका चातुरकर (8999393481). 4.विनीत चौहान(72080 17158)

**(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**